# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे

तहसिलदार कार्यालय ठाणे, ठाणे स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) तालुका ठाणे जि. ठाणे
पिन कोड :- ४०० ६०१   दुरध्वनी क्र :- ०२२ - २५३३११६४

---

क्र.मह/क-१/टे-२/ज.बा/कावि-२७६८/एसआर-४२/२०१८ दिनांक -23/०२/२०१८

प्रति,
महावीर डेव्हलपर्स,
शॉप नं. ३ आणि ४, हॉली कॉम्प्लेक्स,
एफ-विंग, दिपक हॉस्पीटलच्या मागे,
पी.के.रोड, भाईंदर (पु)

**विषयः- रुपांतरित व अकृषिक वापराचा कर भरणेकामी**
**संदर्भ :-** (१) आपला दिनांक-०३/०२/२०१८ रोजीचा अर्ज.
(२) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील महाराष्ट्र जमीन महसून संहिता (सुधारणा) अध्यादेश २०१७, अधिसुचना दिनांक-०५/०१/२०१७

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय अर्जान्वये आपण मौजे-गोडदेव ता.जि.ठाणे येथील जुना स.नं. ३३५/८ नविन स.नं. २५/८ क्षेत्र ६६०.०० चौमी या जागेबाबत रुपांतरित कर भरुन घेणेबाबत या कार्यालयात संदर्भिय अर्ज क्र. १ अन्वये विनंती अर्ज सादर केलेला आहे.

शासन महसुल व वन विभाग यांचेकडील सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दि. ०५/०१/२०१७ (महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश) जारी करणेत येऊन उक्त संहिता कलम ४२अ नंतर ४२ब, ४२क हे नव्याने समाविष्ट करणेत येऊन सुधारणा करणेत आलेली आहे.

या अधिसुचनेनुसार या क्षेत्रात रुपांतरित कर भरुन घेणे व अकृषिक आकारणी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडील पत्र जा.क्र.मि.भा/मनपा/नर/९७/२०१५-१६, दिनांक-०९/०४/२०१५ अन्वये मंजुर बांधकाम प्रारंभपत्रानुसार सदर स.नं. चा वापर रहिवास वापरासाठी करावयाचा आहे.

त्यानुसार मौजे-गोडदेव ता.जि.ठाणे येथील जुना स.नं. ३३५/८ नविन स.नं. २५/८ क्षेत्र ६६०.०० चौमी या जागेबाबत रुपांतरित कराची आकारणी व सन २०११ या वर्षाची अकृषीक आकारणी खालीलप्रमाणे होत आहे.

मौजे गोडदेव या गावाकरिता बिनशेती आकारणी दर ७.०० पै.प्रति चौ.मी.

अकृषीक आकारणी (रहिवास प्रयोजनार्थ) = बिनशेती दर X क्षेत्र

= ७.०० X ६६०.०० चौमी = ४६२०.००

रुपांतरित कर = अकृषिक कर X ५= ४६२०.०० X ५ = २३१००.००

एकुण रक्कम = अकृषिक आकारणी + रुपांतरित कर = ४६२०.०० + २३१००.००

= २७७२०.००

Scanned with CamScanner

वरीलप्रमाणे अकृषिक कर व रुपांतरित कर मिळुण होणारी एकुण रक्कम रुपये २७७२०/- (सत्तावीस हजार सातशे वीस रुपये मात्र) सदर रक्कमेचा धनादेश SBI GOVT E-COLLECTION A/C ३२९२२२१५७२९ या नावाने या कार्यालयात जमा करणेत यावा तसेच सदरची रक्कम चलनाद्वारे शासनजमा केलेनंतर, नियोजन प्राधिकारी यांचेकडून बांधकामाबाबत परवानगी (IOD/CC), मौजे-गोडदेव ता.जि.ठाणे येथील जुना स.नं. ३३५/८ नविन स.नं. २५/८ क्षेत्र ६६०.०० चौमी या जमिनीचे अद्यायवत ७/१२ उतारे व बांधकाम परवानगीच्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी सो.ठाणे यांचे कार्यालयात सनद मिळणेकामी अर्ज सादर करावा.

तहसिलदार ठाणे

Scanned with CamScanner